**मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य**

# प्रेस नोट

## दिनांक २१ ऑक्टोंबर, २०१९

नमस्कार...

महाराष्ट्रातील विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीचे मतदान आज शांततेत पार पडले आहे. अशा रितीने महाराष्ट्रातील विधानसभेच्या सर्व दोनशे अठ्यांऐशी (२८८) जागांसाठी व सातारा लोकसभा मतदार संघातील पोट निवडणूकीच्या मतदानाचा कार्यक्रम सुरळीतपणे पुर्ण झाला आहे. मतदानांची वेळ सकाळी ७-०० ते संध्याकाळी ६-०० वाजता अशी होती. तर, विधानसभा मतदार संघ ६३-अर्जुनी मोरगांव, ६६-आमगांव, ६७- आरमोरी, ६८-गडचिरोली आणि ६९-अहेरी या ठिकाणी सकाळी ७-०० ते दुपारी ३-०० वाजता अशी होती.

मतदानाच्या आकडेवारीचा तक्ता स्वतंत्र जोडला आहे.

महाराष्ट्रातील मतदानाची संपूर्ण प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी मतदारांनी जे महत्वपूर्ण योगदान दिले त्याबद्दल भारत निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातर्फे मी सर्व मतदारांना धन्यवाद देतो आणि त्यांचे आभार मानतो. त्याचप्रमाणे या संपूर्ण कालावधीमध्ये आपण सर्व प्रसिध्दी माध्यमांनी जे सकारात्मक सहकार्य दिले त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.

**<u>मतदार यादी :-</u>**

सन २०१९ या वर्षी होणारी निवडणूक विचारात घेऊन जानेवारी, २०१८ पासून मतदार यादी शुध्द व अद्ययावत (Pure & Update) करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले आहेत. मतदारांमध्ये जागृती निर्माण करणे आणि त्यांचा सहभाग वाढविणे याकरिता SVEEP अंतर्गत विविध उपक्रम हाती घेण्यात आले. त्याचा खुप चांगला परिणाम झाला. व लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ (८,८५,६५,५४७) च्या तुलनेत विधानसभा निवडणूक - २०१९ मध्ये मतदारांची संख्या ८,९८,३९,६०० इतकी झाली. म्हणजेच मतदारांची संख्या २,७४,०५३ ने वाढली.

**<u>मतदानाची वैशिष्ट्ये :-</u>**

महाराष्ट्रात झालेल्या मतदानाची वैशिष्ट्ये थोडक्यात पुढीलप्रमाणे आहेत :-

- पुणे जिल्ह्यातील २१५-कसबापेठ मतदार संघामध्ये, भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पथदर्शी प्रकल्प (Pilot Project) म्हणून प्रथमच बारकोडींगचा वापर करण्यात आला.
- दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांच्या सेवेसाठी एकूण ५४३५ इतकी मतदान केंद्रे वरच्या मजल्यावरुन तळ मजल्यावर स्थलांतरीत करण्यात आली असल्यामुळे दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांना मतदान करण्यामध्ये कोणतीही अडचण निर्माण झाली नाही.

- अतिवृष्टी झाल्यामुळे २५९-कराड उत्तर मतदारसंघातील मतदान केंद्र क्र. ३१ या केंद्राचे स्थलांतर मतदानाच्या आदल्यादिवशी करण्यात आले.
- दिनांक २०/१०/२०१९ रोजी दिवसा व रात्री महाराष्ट्राच्या मराठवाडा, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्र या भागात पाऊस झाला. उस्मानाबाद, लातूर, जालना, परभणी आणि सातारा येथे मुसळधार पाऊस झाल्याने काही ठिकाणी पोलिंग पार्टीच्या दळणवळणामध्ये अडचण निर्माण झाली होती. मात्र पोलिंग पार्टी वेळेवर कर्तव्याच्या ठिकाणी दाखल झाल्या आणि मतदान सुरळीतपणे पार पाडण्यात आले.
- रायगड व पालघर जिल्ह्यामध्ये रुग्णालयातील रुग्णांसाठी रुग्णवाहिकेची सुविधा उपलब्ध करण्यात आली होती.
- विशेषत: शहरी भागांमध्ये मतदारांनी तसेच Celebrities यांनी अतिशय उत्साहामध्ये भाग घेऊन मतदान केले.
- शहरी भागांमध्ये, सुट्टयांचे दिवस असूनही, मतदानाचे प्रमाण चांगले राहीले आहे.
- गडचिरोली जिल्ह्यामध्ये ६९-अहेरी या मतदार संघासाठी नियुक्त करण्यात आलेल्या एका पोलीस अधिकाऱ्याची (श्री. बापू पांडू गावडे, वय ४५ वर्षे ) तब्येत बिघडल्यामुळे त्यांना हेलिकॉप्टरने चंद्रपूर येथील शासकीय इस्पितळात दाखल करण्यात आले होते. परंतु उपचारादरम्यान दिनांक २१/१०/२०१९ रोजी दुपारी १-३० वाजता मृत्यू झाला.
- नुतन शाळा, रामबाग, ठाणे येथे बंदोबस्तावर नेमण्यात आलेल्या श्री. जयराम तरे (बक्कल नंबर ५३५२) वय ४८ वर्षे यांना ह्रदयविकाराच्या झटका आल्यामुळे त्यांना वेळीस इस्पितळामध्ये दाखल करण्यत आले. आता त्यांची तब्येत चांगली झाली आहे.

**<u>दिव्यांग मतदार :-</u>**

भारत निवडणूक आयोगाने यावेळी दिव्यांग मतदारांसाठी “सुलभ निवडणूका” (Accessible Elections) हे घोषवाक्य जाहीर केले होते. याअंतर्गत दिव्यांग मतदारांची जास्तीत जास्त नोंदणी करण्यासाठी आणि त्यांना मतदान करणे सुलभ व्हावे याकरिता मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात आले होते. त्याचे चांगले फलित म्हणून लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ मध्ये ३,०९,२३३ इतके दिव्यांग मतदार होते परंतू यावेळी सुमारे तीन लाख शहाण्णव हजार सहाशे त्र्याहत्तर (३,९६,६७३) इतक्या दिव्यांग व्यक्तींची मतदार म्हणून नोंदणी करण्यात आली आहे. म्हणजेच सुमारे ९० हजार नवीन दिव्यांग मतदारांची नोंदणी करण्यात आली आहे.

**<u>मतदान केंद्र (Polling Station) :-</u>**

यावेळी एकूण शहाण्णव हजार सहाशे ऐकसष्ठ (९६,६६१) इतक्या मतदान केंद्रांवर मतदान घेण्यात आले. सन २०१४ च्या तुलनेत यावेळी मतदान केंद्रांच्या संख्येमध्ये एकूण आठ हजार एकशे एकसष्ठ (८,१६१) इतकी वाढ झाली आहे. तसेच आताच्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या मतदान केंद्रांमध्ये सखी मतदान केंद्र-३५२, आदर्श मतदान केंद्र-२८८ दिव्यांग मतदान केंद्र-१०६ व वेब कास्टींग-१००१३ याही मतदान केंद्रांचा समावेश करण्यात आला आहे.

**निवडणूक कर्मचारी :-**

संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याकरिता सुमारे सात लाख पन्नास हजार (७,४९,३७४) इतक्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सुमारे एक लाख चार हजार (१,०४,०००) इतक्या पोलीसांची नियुक्ती करण्यात आली होती. याप्रमाणे सुमारे साडे आठ लाख (८,५०,०००) इतके कर्मचारी या निवडणूकीसाठी नियुक्त करण्यात आले होते.

**EVM-VVPAT:-**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ साठी प्रत्यक्ष वापरात (Actual use ) ११२३२८ BU, ९६६६१ CU व ९६६६१ VVPAT मशिन्स होत्या. तर राखीव (Reserve) २४६२५ BU, २१२७७ CU व २८९९२ VVPAT ठेवण्यात आल्या होत्या. त्यापैकी आज दिनांक २१/१०/२०१९ रोजी प्रत्यक्ष मतदानाचे दिवशी प्रारुप मतदान घेतले असता त्यात ३४४५EVM-VVPAT मशिन्स, ( ५२२ BU, ९४९ CU & १९७४ VVPAT ) नादूरुस्त झाल्या. तर प्रत्यक्ष मतदानाचे काळात सायंकाळी ५-०० वाजेपर्यंत त्यात ४६९८ EVM-VVPAT मशिन्स ६६५ (०.५९%) BU, ५९६ (०.६२%) CU & ३४३७ (३.५६%) VVPAT) नादुरुस्त झाल्या.

प्रारुप मतदानाचे वेळी तसेच प्रत्यक्ष मतदानाचे वेळी नादुरुस्त झालेल्या मशिन्स त्वरीत दुरुस्त करण्यात / बदलण्यात आल्या. त्यामुळे मतदानप्रक्रियेवर कोणताही विपरीत परिणाम झालेला नाही.

EVM मशिन संदर्भात एकूण ३६१ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या १५२, शिवसेना ८९ व इतर १२० अशा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त झालेल्या तक्रारी त्वरीत संबंधीत जिल्हाधिकारी कार्यालयास त्वरीत कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेल्या आहेत.

**आदर्श आचारसंहिता (MCC) :-**

आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि बेकायदेशीर आर्थिक व्यवहारांवर संनियंत्रण ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर FST (१५६७), SST (१६६०), VST (१०९२) इतकी पथके नेमण्यात आली होती. या व्यतिरिक्त दक्ष नागरिकांना आचारसंहिता भंगाची प्रकरणे नोंदविण्यासाठी आयोगाने C-Vigil हे Application उपलब्ध करुन दिले होते.

**माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समिती (Media Certification and Monitoring Committee) :-**

राजकीय पक्षांच्या व उमेदवारांच्या जाहिराती प्रमाणिकरण करण्यासाठी अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली तर जिल्हास्तरावर उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समिती (Media Certification and Monitoring Committee) स्थापन करण्यात आली आहे. अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती समोर ऑडीओ, व्हिडोओ व पोस्टर करीता आतापर्यंत पुढील प्रमाणे विविध राजकीय पक्षाकडून विनंती प्राप्त झाली आहे.

| राजकीय पक्ष | मंजूर | | | | एकूण | आक्षेप | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ऑडीओ | व्हिडीओ | पोस्टर | पथनाटय | | ऑडीओ | व्हिडीओ | पोस्टर | पथनाटय | | |
| शिवसेना | ३७ | ३९ | २३० | - | ३०६ | १५ | ८ | ३० | - | | ५३ |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भारतीय जनता पक्ष | २० | ७२ | २०० | ८ | ३०० | ९ | १७ | २९ | ५ | ६० |
| वंचित बहूजन आघाडी | ९ | ३ | ११ | - | २३ | - | ८ | १ | - | ९ |
| काँग्रेस | ५ | १५ | ७ | - | २७ | ५ | ६ | - | - | ११ |
| राष्ट्रवादी कॉंग्रेस | ७ | ९ | २ | - | १८ | १ | - | - | | १ |
| महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ८ | - | - | - | ८ | १ | - | - | | १ |
| **एकूण** | **८६** | **१३८** | **४५०** | **८** | **६८२** | **३१** | **३९** | **६०** | **५** | **१३५** |

वरील दोन्ही समितीच्या निर्णयाविरुध्द अपिल करण्याकरिता मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. या समिती समोर आजच एक पेड न्यूज संदर्भातील अपील दाखल झाले आहे. त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. एकच अपील प्राप्त झाले आहे हे पाहता वरील दोन्ही समित्यांनी त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या चांगल्या प्रकारे पार पाडल्या आहेत, असे स्पष्ट होत आहे.

**<u>सोशल मिडिया मॉनिटरिंग</u>**

पोलीस विभागाच्या सायबर शाखेअंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या समितीमार्फत सोशल मिडियाचे निवडणूक आदर्श आचारसंहितेच्या दृष्टीने मॉनिटरिंग करण्यात आले.

**<u>जप्तीची प्रकरणे (Seizers) :-</u>**

आतापर्यंत आयकर विभाग, अबकारी विभाग, पोलीस यांनी एकूण रुपये सदुसष्ट कोटी बावन्न लाख (६७.५२) इतकी रोख रक्कम, रुपये चौप्पन्न कोटी पन्नास लाख (५४.५०) रकमेचे सोने, रुपये तेवीस कोटी एकवीस लाख (२३.२१) रकमेचे मद्य व रुपये वीस कोटी पंच्याहत्तर लाख (२०.७५) मादक पदार्थ, याप्रमाणे एकूण रुपये एकशे पासष्ट कोटी नव्यान्नव लाख (१६५.९९) इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त केला आहे. आचार संहितेच्या उलंघनाबाबत २१२४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच याव्यतिरिक्त Prohibition Act, Food & Drugs Act या कायद्याखाली ११५०६ इतके गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

शेवटी, मी पुन्हा एकदा आपले सर्वांचे आभार मानतो. दिनांक २४ ऑक्टोंबर, २०१९ रोजी मतमोजणी करण्यात येणार आहे. त्यावेळी देखील आपले असेच सहकार्य मिळेल असा मला विश्वास आहे.

धन्यवाद.....

- - - - - - - - - -